प्रत मिळाली — दि.डा.कुचीवाले

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): सांगली **P.S.**(ठाणे): इस्लामपूर **Year** (वर्ष): 2019

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0683 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 26/09/2019 05:22 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): बुधवार
**Time Period** (कालावधी): पहर 5
**Date From** (दिनांक पासून): 25/09/2019
**Date To** ( दिनांक पर्यंत): 25/09/2019
**Time From** (वेळेपासून): 14:17 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 14:17 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 26/09/2019 **Time** (वेळ): 05:22 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ
**Entry No.** (नोंद क्र.): 004 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 26/09/2019 05:22 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): उत्तर, 0.1 किमी
**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): इस्लामपूर पोलिस ठाणेतील ,पहिल्या मजल्यावरील स्टाफरूम मध, इस्लामपूर ,वाळवा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री दिपक दाजी कुचीवाले

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1989 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

**(h) Address** (पत्ता):

| **S.No.**(अ. क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | माकडवाले वसाहत,सरकारी ,दवाखाना रोड ,इस्लामपूर ,वाळवा ,इस्लामपूर,सांगली,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | माकडवाले वसाहत,सरकारी ,दवाखाना रोड ,इस्लामपूर ,वाळवा ,इस्लामपूर,सांगली,महाराष्ट्र, भारत |

**(i) Occupation** (व्यवसाय):

**(j) Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बाळासाहेब केशव पाटील | | | 1. राशिवम कलनी ,सरकारी दवाखान्य, पाठीमागे इस्लामपूर,वाळवा ,इस्लामपूर, सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सतिश मारुती माळी | | | 1. नदीवेस पवार गल्ली नंदकुमार जाध,यांचे घराचे पाठीमागे पाटील ,यांचे घरी भाड्याने मिरज ,मिरज ,मिरज पोलीस स्टेशन,सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ. क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

वर्दीजबाब ता.26/09/2019

मी दिपक दाजी कुचीवाले, वय.30 वर्षे व्यवसाय-ड्रायव्हर रा. माकडवाले वसाहत, सरकारी दवाखाना रोड, इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली मोबाईल नंबर 9890883056.

मी वरील ठिकाणचा राहणारा असून माझा सख्खा चुलत भाऊ आकाश रामू कुचीवाले, माझे भावाचा मेव्हणा रुपेश व माझा चुलत भावाचा मुलगा सागर सुकाप्पा कुचीवाले यांचे विरुध्द यशवंत लाखे यांनी एक डुकर चोरी केलेबाबत दिलेल्या तक्रारीवरुन इस्लामपूर पोलीस ठाणेत चोरीचा गुन्हा दि.20.9.2019 रोजी दाखल केला होता. सदर गुन्हयात वरील तिघांना दि.23.9.2019 रोजी पोलीसांनी अटक केली असल्याचे समजलेने मी दुपारी 12.00 वा.चे सुमारास इस्लामपूर पोलीस ठाणे येथे जावून चौकशी केली. त्यावेळी सदरचा गुन्हा हा इस्लामपूर पोलीस ठाणेकडील माळी पोलीस हवालदार यांचेकडे तपासास असल्याचे समजले. हवालदार माळी हे पोलीस ठाणेत हजर होते. मी त्यांना भेटलो. त्यावेळी तेथे बी. के.पाटील पोलीस हे हजर होते. श्री.बी.के.पाटील हे मला पाहून तू का आला आहेस असे त्यांनी मला विचारले त्यावेळी आमचे नातेवाईकांना पोलीस ठाणेला आणले आहे, त्यासाठी आलो आहे असे म्हणालो. त्यावेळी बी.के.पाटील, पोलीस हे मला चोरीचा तपास मी व माळी हवालदार असे दोघे मिळून करीत आहे. तुझ्या नातेवाईकांना गुन्हयात आम्ही मदत करतो, तु आम्हाला 10,000/-रुपये आणून दे असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना एवढे पैशाची जुळणी होणार नाही असे सांगितले. त्यावेळी बी.के.पाटील पोलीस यांनी आम्हाला 10,000/-रुपये दिल्याशिवाय तुझ्या नातेवाईकांना गुन्हयात मदत करणार नाही असे सांगितले. त्यावेळी बी.के.पाटील यांनी त्यांचा मोबाईल नंबर मला दिला व माझा मोबाईल नंबर लिहून घेतला व त्यानंतर मी तेथून निघून आलो.

दि.24.9.2019 रोजी दुपारी 02.00 वा.चे सुमारास श्री बी.के.पाटील पोलीस यांनी माझे मोबाईलवर फोन करून इस्लामपूर पोलीस ठाणे येथे येण्यास सांगीतले,त्याप्रमाणे मी इस्लामपूर पोलीस ठाणे येथे गेलो, त्याठिकाणी बी.के.पाटील व माळी हवालदार हे हजर होते. त्यावेळी बी.के.

पोलीस हे मला पाहून त्यांना घेवून आलास का? असे मला विचारले तेव्हा मी त्यांना नाही असे म्हणालो. त्यानंतर बी.के.पाटील हे पंचाना पाहून यांना का घेवून आला आहेस. हे कोण आहेत, असे विचारले व त्यांचे नांव गांव विचारले त्यावेळी पंच नं.1 यांनी त्यांचे नांव विलास सुबराव चव्हाण असे सांगीतले, त्यावेळी तुम्ही काय करता असे बी.के.पाटील, पोलीस यांनी पंच नं.1 यांना विचारले असता पंच नं.1 यांनी इस्लामपूर नगरपालीकेत सुपरवायझर असलेचे सांगून शिवनगर येथे काम चालू असलेचे सांगीतले. त्यावेळी बी.के.पाटील यांनी पंच नं.1 यांना तुम्ही बाहेर जावा असे सांगीतले. पंच नं.1 हे सदर स्टापरुम मधून बाहेर येवून दरवाज्याचे बाजूस थांबले. त्यानंतर मी बाहेर येवून पंच नं.1 यांना त्यांना तुमचा संशय आला आहे असे सांगीतले. त्यावेळी पंच नं.1 हे खाली निघून गेले. त्यानंतर मी स्टापरुममध्ये गेलो. त्यावेळी बी.के.पाटील पोलीस यांनी पैसे आणलेत का असे मला विचारले. त्यावेळी मी पैसे आणलेत असे सांगीतले. त्यावर बी.के.पाटील पोलीस हे माळी हवालदार यांना मी पांच हजार रुपये आणले असलेचे सांगीतले. त्यावेळी मी बी.के.पाटील यांना तुम्ही सांगीतले प्रमाणे मी 10,000/-रुपये आणले असलेचे सांगीतले. त्यावेळी बी.के.पाटील पोलीस यांनी हाताने खुनवून पैसे मागणी केली. त्यावेळी मी माझे उजवे हाताने माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजूचे खिशातील लाचेची रक्कम काढून बी.के.पाटील पोलीस यांचे समोर धरली असता, त्यांनी ती लाचेची रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारुन लागलीच माळी हवालदार यांचेकडे दिली. माळी हवालदार यांनी त्यांचे सरकारी शर्टचे उजवे बाजूचे खिशात ठेवली. त्यानंतर माळी हवालदार हे स्टापरुम मधून बाहेर जावू लागले, मी त्यांचे पाठोपाठ बाहेर आलो. आमचे पाठोपाठ बी.के.पाटील पोलीस हे बाहेर आले व ते एका महीले बरोबर बोलत उभे राहीले. माळी हवालदार हे खाली आले. त्यांचे पाठोपाठ मी ही खाली आलो. तो पर्यत पाठीमागून बी.के.पाटील पोलीस आले, बी.के.पाटील व माळी हवालदार हे दोघे पोलीस स्टेशनचे बाहेर येवून पार्किंगमध्ये असलेली त्यांच्या मोटर सायकली घेवून ते पोलीस वसाहती समोरील ग्राऊन्डमधून निघून जाऊ लागले. मी लागलीच चौगुले साहेब यांचे जवळ गेलो. त्यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करुन ताबेत घेतला. त्यावेळी त्यांना पोलीस ठाणेचे पार्किंग मधून दोन वेगवेगळया मोटर सायकली वरुन जात असलेले पोलीस कर्मचारी यांचेकडे बोट करुन त्यातील एक बी.के.पाटील पोलीस व एक माळी हवालदार असल्याचे सांगून बी.के.पाटील पोलीस यांनी माझ्याकडून लाच स्विकारली असल्याचे सांगीतले. लागलीच चौगुले साहेबांनी कलकुटगी व सागर तसेच मला व पंच नं.1 यांना पाटील व माळी यांचा पाठलाग करण्याबाबत सुचना दिल्या. त्या प्रमाणे मी व पंच नं.1 पाटील असे माझे मोटर सायकल वरुन व कलकुटगी व सागर असे त्यांचेकडील मोटर सायकल वरुन रवाना झालो, आमचे पाठोपाठ चौगुले साहेब, मोरे साहेब व पंच नं.2 असे खाजगी तवेरा गाडी मधून रवाना झाले. बी.के.पाटील पोलीस व माळी हवालदार हे कोणत्या दिशेने गेलेचे दिसून न आलेने मी माझी मोटर सायकल रोडकडेला थांबविली. तो पर्यत पाठीमागून तवेरा गाडीतून चौगुले साहेब व सापळा पथक असे माझे जवळ आले. चौगुले साहेबांनी मला माझे मोबाईलवरुन बी.के.पाटील पोलीस यांना फोन करुन त्यांचे ठावठिकाणाबाबत विचारणा करणेस सांगीतली. त्याप्रमाणे मी माझे मोबाईलवरुन बी.के.पाटील यांचे मोबाईलवर फोन करुन त्यांचे ठावठिकाणाबाबत विचारले असता त्यांनी इस्लामपूर चावडी जवळ असलेचे सांगीतले. लागलीच आम्ही सर्वजण आप आपल्या वाहनावरुन इस्लामपूर चावडी जवळ गेलो. त्यावेळी मी बी.के.पाटील व माळी हवालदार यांचेकडे बोट करुन हे बी.के.पाटील व माळी हवालदार असलेचे सांगून पाटील पोलीसांनी माझेकडून 10,000/-रुपये लाचेची मागणी करुन ती त्यांचे उजवे हाताने स्विकारुन ती माळी हवालदार यांचेकडे दिली असून ती माळी हवालदार यांनी त्यांचे उजवे हाताने स्विकारुन त्यांचे शर्टचे उजवे बाजूचे शर्टचे खिशात ठेवली असलेचे सांगीतले. त्यानंतर चौगुले साहेब यांनी दिले सुचने प्रमाणे कलकुटगी यांनी पाटील पोलीस यांचे व सागर यांनी माळी हवालदार यांचे दोन्ही हात घट पकडले. त्यावेळी चौगुले साहेब यांनी मला बाजूला जावून थांबणेस सांगीतले. त्याप्रमाणे मी बाजूला जावून थांबलो.

थोडयावेळाने चौगुले साहेब यांनी मला खाजगी तवेरा गाडीमध्ये बोलवून घेतले. सदर तवेरा गाडीमध्ये अंधार करुन माझे हात व कपडे तपासण्यात आले. त्यावेळी माझे उजवे हाताचे बोटावर व पॅन्टचे पुढील उजवे बाजुचे खिशाचे तोंडास व आतील बाजुस अँ.पा.ची चकाकी दिसून आली. त्यानंतर चौगुले साहेब यांनी मला तवेरा गाडीचे बाहेर जावुन थांबण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी तेथून बाहेर जावुन थांबलो. त्यानंतर थोडया वेळानी चौगुले साहेब यांन मला बोलावून घेवून माझे मोटर सायकलचे हॅडेलवर काळे कापड टाकून अँल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझे मोटर सायकलचे उजवे बाजूचे मुठीवर व ब्रोकवर तसेच मोटर सायकलचे चावीस ठिकठिकाणी अँथ्रासीन पावडरची चकाकी दिसून आली. त्याठिकाणीची कारवाई पुर्ण झालेनंतर चौगुले साहेब यांनी मला शासकीय विश्रामगृह,इस्लामपूर येथे जाणेस सांगीतले. त्याप्रमाणे मी माझे मोटर सायकली वरुन शासकीय विश्रामगृह, इस्लामपूर येथे आलो. थोडया वेळाने चौगुले साहेब हे सापळा पथकासह बी.के. पाटील पोलीस व माळी हवालदार यांना घेवून तवेरा गाडीमधून शासकीय विश्रामगृह,इस्लामपूर आले. मला बाहेरच थांबणेस सांगून ते शासकीय विश्रामगृहामध्ये गेले.

त्यावेळी चौगुले साहेबांनी मला विश्रामगृहाचे बाहेर थांबणेस सांगीतले, त्याप्रमाणे मी विश्रामगृहाचे बाहेर थांबलो. चौगुले साहेबांनी त्यांची पुढील कारवाई सुरु ठेवली. त्यांनतर थोडयावेळाने चौगुले साहेबांनी मला विश्रामगृहात बोलावून घेवून त्यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेतली, त्यानंतर मला विश्रामगृहाचे बाहेर जावून थांबण्यास सांगीतले, त्याप्रमाणे मी विश्रामगृहाचे बाहेर जावून थांबलो. त्यानंतर थोडया वेळाने चौगुले साहेब यांनी मला विश्रामगृहाचे बाहेरुन बोलावुन घेवुन सापळयाची हकीकत विचारली. त्यावेळी मी त्यांना सापळयाची सविस्तर हकीकत सांगीतली. चौगुले साहेबांनी घडले घटनेचा सविस्तर पंचनामा केला.

दि.25.09.2019 रोजी पडताळणी कारवाईचे वेळी माझे नातेवाईकांच्या विरुध्द इस्लामपूर पोलीस ठाणे येथे दाखल असले गन्हयामध्ये सहकार्य करण्यासाठी यातील बाळासाहेब केशव पाटील, सपोफौ इस्लामपूर पोलीस ठाणे यांनी माझेकडे 10,000/-रुपये लाचेची मागणी केली. तसेच सापळयाचे वेळी बाळासाहेब केशव पाटील, सपोफौ यांनी इस्लामपूर पोलीस ठाणेतील पहील्या मजल्यावर असले स्टापरुम मध्ये 10,000 /-रुपये लाचेची रक्कम मागणी करुन स्विकारली व ती सतीश मारुती माळी, पोलीस हवालदार यांचेकडे दिली म्हणून 1) बाळासाहेब केशव पाटील, सपोफौ 2) सतीश मारुती माळी, पोलीस हवालदार दोघे इस्लामपूर पोलीस स्टेशन यांचे विरुध्द माझी फिर्याद आहे.

माझा वर्दी जबाब मला वाचून दाखविला, तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर टाईप केला आहे.

समक्ष हा दिला वर्दीजबाब,

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

पो.नि प्रशांत चौगुले ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): [illegible]

**Rank** (पद): *Asst. SI (Assistant Sub-Inspector)*

**No.**(क्र.): AKWPK9287B **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

[illegible]

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

२८/०९/१९ रोजी ०९.३० वा

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): NARAYAN SHIVAJIRAO

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 1234

PSO (नितीन साळुंखे)

ठाणे अंमलदार
इस्लामपूर पो. ठाणे